क्र.म.रा.र.वि.म./०१/प्रशासन/ १६५०

महाराष्ट्रराज्यरस्तेविकास
महामंडळमर्यादित
(महाराष्ट्रशासनाचाउपक्रम)

कार्यालयीन आदेश क्रमांक ३२५.

- 2 JUL 2008.

विषयः- कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैंगिक छळास प्रतिबंध
महिला तक्रार निवारण समित्यांच्या अध्यक्षांची माहिती
संकलित करणे

संदर्भः- १.शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.मकचौ-२००६/
प्र.क्र.१५/मकक, दिनांक १९ सप्टेंबर २००६
२.महामंडळाचे कार्यालयीन ज्ञापन क्र.MSRDC/०१/Adm./२९६९,
दिनांक ६.७.२००५

कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैंगिक छळास प्रतिबंध करण्याच्या उपाययोजनांचा भाग म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळात संदभाधिन क्रमांक २ येथिल दि.६.७.२००५च्या कार्यालयीन ज्ञापना व्दारे व्दि सदस्य समितीची स्थापना करण्यात आली होती.

२. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक क्र.मकचौ-२००६/ प्र.क्र.१५/मकक, दिनांक १९ सप्टेंबर २००६ अन्वये निर्गमित केलेल्या सविस्तर व मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने महामंडळात स्थापन केलेली सदर समिती आता व्यापक आणि पुर्नरचित करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. ही पुर्नरचित समिती खालील प्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| १. कुमारी विजया गायकवाड, सहाय्यक व्यवस्थापक (वाणिज्य) | -अध्यक्ष |
| २.श्रीमती.जागृती संख्ये, उपअभियंता | -सदस्य |
| ३.श्रीमती.मनिषा चांदोरकर, लेखा अधिकारी | -सदस्य |
| ४.श्रीमती मरिया गोम्स, स्वीय सहाय्यक | -सदस्य |
| ५.श्रीमती दर्शना भाकरे, कनिष्ठ व्यवस्थापक (मानव संसाधन) | -सदस्य सचिव |

समितीने दिनांक १९ सप्टेंबर २००६ च्या शासन निर्णयातील नमूद बाबींच्या अनुषंगाने कार्यवाही करावयाची आहे.

३. समितीने त्याअनुषंगाने सदर शासन निर्णयातील सूचनांनुसार समितीच्या बैठका घेवून महामंडळातील महिला कर्मचा-यांच्या लैंगिक छळाबाबत काही तक्रार प्राप्त झाल्यास त्याबाबत चौकशी करुन त्यांचे अहवाल सादर करावयाचे आहे. या चौकशा गुप्त स्वरुपाच्या राहतील.

समितीच्या बैठका 'सदस्य सचिव' समितीच्या अध्यक्षांशी विचारविनीमय करुन ठरवतील.

'सदस्य सचिव' महामंडळातील महिलांच्या तक्रारीची चौकशी करण्याकरीता समन्वय अधिकारी म्हणून काम पहातील.

नेपियनसीरोड,प्रियदर्शिनीपार्क,मुंबई-४०००३६.
दूरध्वनी:२३६८६११२/२३६९६१०९/३६७१/३६७३फॅक्स:२३६८४९४३
• ई-मेल: msrdc@bom3.vsnl.net.in • वेबसाईट:www.msrdc.org

या समितीची कार्यकक्षा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे नेपियन-सी रोड मुंबई येथील मुख्यालय, वांद्रे (पश्चिम) येथील प्रकल्प कार्यालय तसेच महामंडळाची राज्यात विखुरलेली सर्व शिबीर कार्यालये पर्यंत मर्यादित राहिल.

समितीस प्राप्त होणा-या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करुन आवश्यक असल्यास तक्रारीत समावेश असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांचे स्पष्टिकरण मागवून त्याची तपासणी सदर चौकशी नि:पक्षपणे करु शकतील.

सदर आदेश उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

प्रशासकीय अधिकारी
म.रा.र.वि.म.मर्या., मुंबई